स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
मुख्य कार्यालय, विरार
यशवंत नगर, विरार (प.),
ता.वसई, पालघर - ४०१ ३०३.

२५।८।२६

दूरध्वनी क्र.:०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com
जावक क्र.: व.वि.श.म.क्रीडा/३८६/२०२६-२७
दिनांक : २४/०८/२०२६.

प्रति,

प्र.जनसंपर्क अधिकारी,
माहिती व जनसंपर्क विभाग,
वसई विरार शहर महानगरपालिका

विषय :- वसई विरार शहर व पालघर जिल्हयातील प्राचीन गडकोट, ऐतिहासिक वास्तू स्थळे, प्राचीन धार्मिक स्थळे, पारंपारिक खाद्यसंस्कृती इत्यादी चे संरक्षण व संवर्धन तसेच प्रचार, प्रसार करणेकामी **ऐतिहासिक वारसा संवर्धन** प्रकल्प राबविणे कामी स्वारस्याची अभिरूची (E.O.I.) Expression Of Interest जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, या पत्रासोबत जोडलेली सुचना दि. २५/०८/२०२६ रोजीच्या शासनमान्य स्थानिक व राज्यस्तरीय वर्तमानपत्रात प्रसिध्दी द्यावी.

तसेच प्रसिध्दी झालेल्या वर्तमानपत्राच्या किमान २ प्रती क्रीडा विभाग, मुख्यालय येथे उपलब्ध करून दयाव्यात.

(अजित मुठे)
उपायुक्त (क्रीडा)
वसई-विरार शहर महानगरपालिका

प्रत उचित कार्यवाहीस्तव :
माहिती व तंत्रज्ञान विभाग, मुख्यालय

**प्रस्तावना**

वसई विरार शहर महानगरपालिका (VVCMC) अंतर्गत सार्वजनिक उपयोगासाठी **ऐतिहासिक वारसा संवर्धन प्रकल्प** राबविणेबाबत.

**स्वारस्य अभिव्यक्तीचे उद्दीष्टे** :-

१. स्थानिक गावातील सर्व ऐतिहासिक स्थळे व अवशेषांची नोंदणी व सूचीकरण.
२. स्थानिक गावाच्या लिखित इतिहास विषयक पुस्तके संकलन व नोंदणीकरण.
३. शालेय विद्यार्थी, युवक, संशोधक, अभ्यासक इत्यादी करिता ऐतिहासिक स्थळांची सफर भटकंती, इतिहास मार्गदर्शन.
४. शालेय विद्यार्थी, युवक, संशोधक, अभ्यासक इत्यादी करिता ऐतिहासिक स्थळांवर प्रबोधनपर व्याख्याने, माहिती सत्र, स्लाईड शो उपलब्ध करून देणे.
५. जिल्हयातील प्रत्येक गावातील शस्त्र व जुन्या वस्तू यांचे संकलन, नोंदणीकरण, प्रदर्शन.
६. ऐतिहासिक स्थळांची शालेय विद्यार्थी व युवा वर्गामध्ये सांस्कृतिक जिज्ञासा वाढविण्यासाठी ऐतिहासिक स्थळांची चित्रकला स्पर्धा, व्याख्याने, इतिहास लेखन इत्यादी आयोजन करणे.
७. दुर्गसंवर्धन विषयावर जनजागृती वाढावी यासाठी विविध कार्यशाळा, संस्कार शिबिरे, श्रमदान शिबिरे आयोजित करणे.
८. राज्य व केंद्रीय पुरातत्व विभाग यांना आपल्या भागातील स्थळांच्या संवर्धनासाठी ऐतिहासिक स्थळांच्या संवर्धनासाठी नियमितपणे पुढाकार घेणेबाबत पत्रव्यवहार करणे,
९. इंटरनेट माध्यमातून इतिहासाच्या अचूक माहितीचे प्रसारण करणे,
१०. जुन्या वास्तूंच्या डिजिटल छायाचित्र संकलनाचे उपक्रम आयोजित करणे.
११. जिल्ह्यातील ऐतिहासिक वास्तूंच्या पर्यटनावर आधारित कार्यशाळांचे आयोजन करणे.
१२. ऐतिहासिक स्थळांवर लहान चित्रपट डॉक्युमेंटरी बनवून प्रसारित करणे.
१३. जिल्ह्यातील गावांच्या ऐतिहासिक मोडी लिपीतील कागदपत्रांचे दालन उपलब्ध करणे,
१४. जिल्ह्यातील गडकोटांचे विजय उत्सव, पालखी उत्सव, ऐतिहासिक महापुरुषांच्या पुण्यातिथी स्मरण दिनानिमित्त उपक्रम राबविणे.
१५. जिल्ह्यात येणा-या परदेशी नागरिकांना मार्गदर्शक विभाग उभारणे,
१६. जिल्ह्यातील अभ्यासकांना प्राचीन लिपीचे प्रशिक्षण देणेबाबत वर्ग चालविणे.
१७. नियोजन बध्दरित्या Heritage Walk आयोजित करणे, प्रचार, प्रसार व पुढील सर्व नियोजन करणे.
१८. या अनुषंगाने प्रचार प्रसार व्हावा म्हणून वाचन साहित्य उपलब्ध करून देणे.
१९. Social Media च्या माध्यमातून वसईतील ऐतिहासिक स्थळांची माहिती जगभर पोहोचविणे.

उक्त नमूद १ ते १९ व अशी अनेक उद्दीष्टांची पूर्तता करणेकामी "**ऐतिहासिक वारसा संवर्धन प्रकल्प,** अनुभवी संस्था किंवा जबाबदार व अभ्यासू अशा व्यक्तीची नियुक्ती करणे आवश्यक आहे. सदर प्रकल्प स्वारस्याची अभिरुची (E.O.I.) Expression Of Interest च्या माध्यमातून इतिहास / पुरातत्व / वास्तू / Heritage Conservation मध्ये पदवी / पदव्युत्तर अशी शैक्षणिक पात्रता असल्यास तसेच अनुभवी व्यक्तीस प्राधान्य देणे आवश्यक आहे.

- **पात्रता (Eligibility)**
    a. वास्तुकला / पुरातत्त्व / इतिहास / नगररचना / संवर्धन विषयातील पदवी किंवा पदव्युत्तर पदवी.
    b. Heritage Conservation क्षेत्रातील अनुभव.
    c. शासन / स्थानिक स्वराज्य संस्थेतील अनुभव असल्यास प्राधान्य.
    d. AutoCAD / GIS / Heritage Documentation ज्ञान असल्यास प्राधान्य.

- **आवश्यक कागदपत्रे :-**
  १. शैक्षणिक प्रमाणपत्रे.
  २. अनुभव प्रमाणपत्र.
  ३. ओळखपत्र.
  ४. PAN / Aadhaar.
  ५. पोलीस पडताळणी.
  ६. करारनामा.

- **अटी व शर्ती**
  १. या कामाकरिता एक वर्षाची मुदत देण्यात येत असून कामाचे दरमहा उद्दीष्ट निश्चित केल्यानुसार पुर्तता अहवालाआधारे रक्कम अदा करण्यात येईल.
  २. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नियमांचे पालन बंधनकारक राहील.
  ३. गोपनीय माहिती तृतीय पक्षास देणे प्रतिबंधित राहील. सर्व निर्मित अहवाल, प्रकल्पकिय वर वसई विरार महानगरपालिकेचे स्वामित्व राहील.
  ४. वारसा संवर्धन कार्याचा मासिक अहवाल सादर करणे आवश्यक राहील.
  ५. निष्काळजीपणा आढळल्यास करार समाप्त करता येईल.
  ६. स्वामित्व हक्क (Copy Rights), शासन व न्यायालयीन नियमांचे पालन करणे आवश्यक राहील.
  ७. कोणत्याही संवर्धन उपक्रमास महापालिकेची पूर्व मंजुरी आवश्यक राहील.
  ८. अट व शर्ती भंग झाल्यास करार रद्द करण्याचा हक्क महापालिकेकडे राहील.
  ९. या कामाची बातमी, जाहिरात व इतर व्यावसायिक उपयोगासाठी स्वतंत्र परवानगी आवश्यक.

- **कायदेशीर व प्रशासकीय पालन :-**
  १. सर्व आवश्यक परवाने, परवाना नूतनीकरण व कामगार कायदयांचे पालन करणे.
  २. महानगरपालिकेच्या सर्व सूचनांचे पालन करणे व आवश्यक अहवाल वेळोवेळी सादर करणे.

- **निवड पध्दत :-**
  १. "**ऐतिहासिक वारसा संवर्धन प्रकल्प**" हे सन २०२६-२७, २०२७-२८ व २०२८-२९ या तीन वर्षाकरिता दर मागविण्यात येत आहे.
  २. सदर प्रकल्प स्वारस्याची अभिरुची (E.O.I.) Expression Of Interest साठी प्राप्त झालेल्या अर्जाचे मूल्यमापन करून लघुसूची (Shortlist) तयार केली जाईल.
  ३. लघुसूचीत आलेल्या एजन्सींना तपशीलवार आर.एफ.पी. (Request for Proposal) मागविण्यात येईल.
  ४. पात्र संस्थाकडून बोलीद्वारे अंतिम एजन्सीची निवड केली जाईल.

- **मूल्यमापन निकष :-**

अर्जदार संस्था ज्यांनी पूर्व पात्रता निकष पूर्ण केले आहेत त्यांचे मुल्यमापन तांत्रिक मूल्यमापन निविदा समिती द्वारे करण्यात येईल.

सहभागी निविदाकारानी महानगरपालिकेने कळविलेले वेळी खालील मुद्दयांचे आधारे सादरीकरण (P.P.T.) सादर करावे व निविदेचे अटींच्या आधारे मुल्यमापन करून संस्थाना आर्थिक पात्रता ठरविण्यात येईल.

| अ.क्र. | निकष | गुण |
|---|---|---|
| १ | अनुभव व पात्रता (समान प्रकारच्या प्रकल्पांतील कार्यानुभव) | ३० |
| २ | आर्थिक स्थैर्य व उलाढाल | २० |
| ३ | प्रस्तावित संचालन आराखडा व देखभाल योजना | २० |
| ४ | सादरीकरण (P.P.T) | २० |
| ५ | सामाजिक उपक्रम, प्रचार योजना व नागरिक सहभाग | १० |
| | **एकूण** | **१००** |

निवड होण्यासाठी सहभागीला किमान ५० गुण मिळणे आवश्यक आहे. (अट शिथील करण्याचे सर्व अधिकारी निविदा समितीकडे राहतील.)

**१) अधिकृत स्वाक्षरीदार (Authorized Signature.) :-**

स्वारस्याची अभिरुची (E.O.I.) Expression Of Interest स्वायत अभिरूचीचे अर्ज सादर करताना सादरकर्ता हा त्या संस्थेचा अधिकृत स्वाक्षरीदार असावा तसेच सर्व दस्ताएवज व प्रमाणपत्रे हे अधिकृत स्वाक्षरीदार यानेच प्रमाणित करून पाठवाव्यात. संपूर्ण पत्रव्यवहार हा संस्थेकडून होताना हा अधिकृत स्वाक्षरीदार मार्फतच स्वीकारला जाईल.

**२) स्वारस्य अभिरूची सादर करणे (Submission Of EOI). :-**

सदर स्वारस्य अभिरूची वसई विरार शहर महानगरपालिका यांच्या संकेतस्थळावर http://vvcmc.in वर दस्ताएवज उपलब्ध असेल. तरी सर्व नमूद केलेले कागदपत्रे, प्रपत्र, दस्तावेज, प्रमाणपत्र वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्यालय येथे टपालाने/स्वहस्ते सादर करावेत.

**३) स्वारस्य अभिव्यक्ती (E.O.I.) सोबत लागणारी कागदपत्रे :-**

१. अधिकृतता पत्र (Letter of Authorization).
२. प्रपत्र १ प्रस्तावाचा नमुदा.
३. प्रपत्र २ पूर्व पात्रता निकष (Pre Qualification Criteria).
४. प्रपत्र ३ अनुभवाचा तपशिल.
५. प्रपत्र ४ सहभागीबददल तपशील.
६. प्रपत्र ५ प्रतिज्ञापत्र किंवा स्व-घोषणा.
७. मूल्यमापन निकषांनुसार अतिरिक्त समर्थन करणारे दस्ताऐवज अथवा कागदपत्रे.
८. इतर कोणतीही माहिती अर्जदाराला त्यांचे दावे सिध्द करण्यासाठी सादर करावयाचे असल्यास सोबत जोडावेत.

स्वारस्य अभिरुची चे सर्व दस्ताऐवज हे वसई विरार शहर महानगरपालिका क्रीडा विभाग, मुख्यालय येथे Online किंवा टपालाने, स्वहस्ते सादर करावेत.

सबब वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील सर्व ऐतिहासिक स्थळांची माहिती महानगरपालिका हद्दीतीलच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील शालेय विद्यार्थ्यांना व नागरिकांना व्हावी, तसेच वसईतील पर्यटन विकासाला चालना मिळावी, हा मुख्य उद्देश आहे.

# प्रपत्र १
## स्वारस्य अभिरुचीच्या प्रस्तावाचा नमुना

प्रति,

मा. आयुक्त,
वसई विरार शहर महानगरपालिका.
मुख्यालय, विरार (प.)

विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील "**ऐतिहासिक वारसा संवर्धन प्रकल्प**" चे संचालन व देखभाल करण्याकरिता स्वारस्य अभिरुची (EOI) सादर करणे बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयानुसार, खाली स्वाक्षरी केलेल्यांनी स्वारस्य अभिरुची (EOI) संबंधित सर्व दस्तऐवजांचे तपशीलवार वाचन आणि परीक्षण केले आहे तसेच तुमच्या कार्यक्षेत्रात निर्दिष्ट कार्यक्रमासाठी काम करण्यासाठी याद्वारे स्वारस्य व्यक्त करत आहोत.

| अ.क्र. | बाब | तपशिल |
|---|---|---|
| १ | सहभागी संस्थेचे नाव | |
| २ | पत्ता | |
| ३ | व्यक्तीचे नाव, पद आणि पत्ता (Authorized Signature) | |
| ४ | दूरध्वनी क्रमांक | |
| ५ | मोबाइल क्रमांक (संपर्क व्यक्ती) | |
| ६ | ई-मेल आयडी संस्थेचा | |
| ७ | 7 ई-मेल आयडी (संपर्क प्रमुख) | |

मी/आम्ही खालील प्रमाने कागदपत्रे सोबत जोडले आहेत.

१. अधिकृतता पत्र. (Letter of Authorisation)
२. संस्थेच्या लेटर हेडवर योग्य रित्या सीलबंद आणि अधिकृत व्यक्तीने स्वाक्षरी केलेला अर्ज (प्रपत्र १)
३. पूर्व-पात्रता पात्रता निकष (प्रपत्र २).
४. सार्वजनिक "**ऐतिहासिक वारसा संवर्धन प्रकल्प**" चालवण्याचा अनुभव (प्रपत्र ३)
५. अर्जदाराबद्दल तपशील (प्रपत्र ४)
६. प्रतिज्ञापत्र/स्व-घोषणा (प्रपत्र ५)
७. आवश्यक कागदपत्रांच्या स्व-प्रमाणित प्रती (Attested Copy Of Supporting Documents).
८. मागील तीन वर्षाचे प्राप्तीकर विवरण (ITR returns), ताळेबंद विवरण (Account And Balance sheet).

मी/आम्ही याद्वारे घोषित करतो की माझा/आमचा स्वायत अभिव्यक्ती (EOI) सद्भावनेने केला आहे आणि त्यात असलेली माहिती हि खरी आहे.

आपला विश्वासू

सही
पद
शिक्का
दिनांक
स्थळ-

## प्रपत्र २
## पूर्व-पात्रता निकष

| अ.क्र. | विवरण | पृ.क्र. |
|---|---|---|
| १ | अर्जदार नोंदणीकृत सार्वजनिक/खाजगी मर्यादित कंपनी, भागीदारी १ संस्था, सहकारी संस्था किंवा नोंदणीकृत ट्रस्ट/NGO - आहे /नाही | |
| २ | वैध GST नोंदणी, PAN क्रमांक व लागू असलेले सर्व परवाने असावेत. | |
| ३ | किमान ३ वर्षांचा अनुभव "ऐतिहासिक वारसा संवर्धन प्रकल्प" यांच्या संचालन व देखभाली बाबतचे अनुभव प्रमाण पत्र. | |
| ४ | अशा प्रकारच्या किमान २ प्रकल्पांचे यशस्वी पूर्णत्व प्रमाणपत्र (Work Completion Certificate) | |
| ५ | मागील ३ वर्षांचे ऑडिटेड बॅलन्स शीट / CA प्रमाणित आर्थिक अहवाल आवश्यक. | |
| ६ | प्रशिक्षित व प्रमाणित "ऐतिहासिक वारसा संवर्धन प्रकल्प" चे कामगार नियुक्त करण्याची क्षमता | |
| ७ | संस्था / व्यक्ती वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत कार्यरत असल्यास तपशीलवार माहिती. | |

**अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी**

## प्रपत्र ३

## सार्वजनिक "ऐतिहासिक वारसा संवर्धन प्रकल्प" चालवण्याच्या अनुभावाचे तपशील

सार्वजनिक "ऐतिहासिक वारसा संवर्धन प्रकल्प" चालवण्याच्या अनुभवाचे तपशील आणि पूर्ण झालेल्या / हातात असलेल्या प्रकल्पांची माहिती.

| अ.क्र. | उपक्रम राबिविणाऱ्या स्वायत संस्थेचे नाव (Name Of Hiring Authority) | स्वायत संस्थेचा पत्ता व संपर्क तपशील | कामाचे स्वरुप | उपक्रम चालू केल्याची दिनांक | उपक्रम समाप्त केल्याची दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी**

टीप :-

कृपया लक्षात घ्या कामावर घेणाऱ्या प्राधिकरणाकडून कार्यारंभ आदेश (वर्क ऑर्डर) सादर करणे आवश्यक आहे.

## प्रपत्र ४
## सहभागी स्वयं सेवी संस्था बद्दल तपशील

| | |
|---|---|
| स्वयंसेवी संस्थेचे नाव | |
| कामाचा अनुभव | |
| कार्यालयाची पत्ता | |
| इतर अनुषंगिक माहिती | |
| इतर आवश्यक दस्तावेज<br>१)<br>२)<br>३) | |

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

**प्रपत्र ५**

# शपथ पत्र किंवा
# स्व-घोषणा

**संदर्भ:- स्वारस्य अभिरुची (EOI) वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील "ऐतिहासिक वारसा संवर्धन प्रकल्प" चे संचालन व देखभाल करण्याकरिता स्वारस्य अभिरुची (EOI) सादर करणे बाबत.**

निवड प्रक्रियेत सहभागी होण्यापासून वगळण्यात येईल जर,

१) संस्था किंवा संस्था चालक दिवाळखोरी झाली असल्यास, अथवा न्यायालीन प्रकरणात कर्ज देणाऱ्या सोबत सामंजस्य / अथवा सेटलमेंट झाली असल्यास.

२) त्यांच्या व्यावसायिक वर्तनाशी संबंधित गुन्ह्यासाठी दोषी ठरविण्यात आले आहे, असे कुठलेही न्यायिक प्रकरण.

३) कोणत्याही मार्गाने सिद्ध झालेल्या गंभीर व्यावसायिक गैरवर्तनासाठी दोषी आहेत, जे करार प्राधिकरण न्याय ठरवू शकते.

४) भ्रष्टाचार, आणि गुन्हेगारी संघटना किंवा इतर कोणत्याही बेकायदेशीर घटकापासून सहभाग समुदायांच्या आर्थिकहित संबंध असल्यास

५) ह्या आधी इतर प्राधिकरणा सोबत करार केल्या नंतर करार पूर्ण न करताच करार मोडला असल्यास.

६) कुठलाही राजकीय दबाव आणल्यास तुमच्या स्वारस्याच्या अभिव्यक्तीच्या आव्हानाला प्रतिसाद म्हणून, मी/आम्ही याद्वारे घोषित करतो की,

- मी/आम्ही मला/आम्हाला वरील पैकी कुठलीही परीस्थिती लागू होत नाही.
- मी/आम्ही व्यवसायातील सर्वोच्च नैतिक मानकांचे पालन करण्यास सहमत आहोत आणि विशेषतः हितसंबंधांचा कोणताही संभाव्य संघर्ष नाही (CONFLICT OF INTEREST)
- स्वायत अभिव्यक्ती (EOI) प्रक्रियेदरम्यान किंवा अंमलबजावणी दरम्यान कोणत्याही टप्यावर वरीलमध्ये काही बदल आढळल्यास मी/आम्ही प्राधिकरणाला ताबडतोब कळवेन.
- मी/आम्ही पूर्णपणे ओळखतो आणि स्वीकारतो कि, कोणतीही चुकीची किंवा अपूर्ण माहिती जाणून बुजून दिलेली असल्यास स्वायत अभिव्यक्ती (EOI) अर्ज नाकारण्यात येऊ शकतो.

(अर्जदाराची किंवा संस्थेच्या अधिकृत प्रतिनिधीची स्वाक्षरी,स्टॅम्प/सीलसह)

विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्राचीन गडकोट, ऐतिहासिक वास्तू, प्राचीन धार्मिक स्थळे इ. चे संरक्षण व संवर्धन तसेच प्रचार, प्रसार करणेकामी **ऐतिहासिक वारसा संवर्धन प्रकल्प** स्वारस्याची अभिरूची Expression Of Interest (E.O.I.) मागविणेबाबत.

आर्थिक प्रस्ताव.
(स्वतंत्र सिलबंद लिफाफ्यात सादर करावे.)
कामाचे नाव :
संस्था/अर्जदार यांचे नाव व पत्ता.

मी वरील **ऐतिहासिक वारसा संवर्धन प्रकल्प** या कामाकरिता माझे संस्थेचे खालीलप्रमाणे दर सादर करीत आहे.

| कामाचे नाव | एकूण दर (सर्व करासह) | दरमहा रक्कम (सर्व करासह) |
|---|---|---|
| | | |

स्वाक्षरी

नाव

स्वातंत्र्याचा अमृत महोस्तव
मुख्य कार्यालय, विरार
यशवंत नगर,विरार (प.),
ता.वसई, पालघर - ४०१ ३०३.

दूरध्वनी क्र.:०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com
जावक क्र.: व.वि.श.म.क्रिडा/३८५/२०२६-२७
दिनांक : २४/०८/२०२६.

# स्वारस्य अभिव्यक्ती

## (EOI-EXPRESSION OF INTEREST)

वसई विरार शहर व पालघर जिल्हयातील प्राचीन गडकोट, ऐतिहासिक वास्तू स्थळे, प्राचीन धार्मिक स्थळे, पारंपारिक खाद्यसंस्कृती इत्यादी चे संरक्षण व संवर्धन तसेच प्रचार, प्रसार करणेकामी **ऐतिहासिक वारसा संवर्धन** प्रकल्प राबविणे कामी स्वारस्याची अभिरूची (E.O.I.) Expression Of Interest मागविण्यात येत आहे. त्याकरिता सन २०२६-२७, २०२७-२८ व २०२८-२९ या तीन वर्षाकरिता अटी व शर्ती अधिन राहून अनुभवी व्यक्ती / संस्थाकडून दर मागविणेत येत आहे.

तरी याबाबत अनुभवी व इच्छुक व्यक्ती/ संस्थानी दि.०४/०९/२०२६ पर्यत mahatenders.gov.in वर online अर्ज सादर करावे. अर्जाच्या नमुना प्रपत्र १ ते प्रपत्र ५ वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या www.vvcmc.in या Website वर उपलब्ध आहे.

| | |
|---|---|
| स्वारस्य अभिव्यक्ती ची प्रसिध्दी | दि. २६/०८/२०२६ , सकाळी ११.०० वाजे पासून ते दि. ०४/०९/२०२६, दुपारी ३.०० वाजेपर्यत |
| स्वारस्य अभिव्यक्ती ची कागदपत्र छाननी | दि. ०७/०९/२०२६, सकाळी ११.०० वाजता |
| निविदा पुर्व बैठक | स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. |
| पुर्व पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या स्वारस्य अभिव्यक्तीतील पात्र संस्थेचे सादरीकरण | स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. |
| स्वारस्य अभव्यक्तीतील पात्र संस्थेची निवड व घोषणा | स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. |

( मिता कार )
सहा.आयुक्त (क्रीडा)
वसई-विरार शहर महानगरपालिका